# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २४.०७.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) गिट्टीखदान पोलीसांची कामगीरी :— जिवे ठार मारणाऱ्या अट्टल गुन्हेगारांविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई.**

दिनांक २९.०६.२०२६ चे १८.३० ते १९.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी सलमान इशाक शेख वय ३५ वर्ष रा. नटराज सोसायटी, प्लॉट क्र. ७१, गोरेवाडा, मानकापूर, नागपूर हे व त्यांचे इतर ०३ मित्र हे पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत फुटाळा तलाव ते वायुसेना कडे जाणारे रोडवर एका भुट्टा विक्री करणारे ठेल्याजवळ भुट्टा खात असतांना, तेथे आरोपी योगेंद्र उर्फ लाला शिवांकात पांडे वय २० वर्ष रा. संजयनगर, पांढराबोडी, सिंगल लाईन, अंबाझरी, नागपूर व त्याचे इतर साथीदार यांनी येवुन, आरोपींनी फिर्यादीसोबत किरकोळ कारणावरुन वाद करून, फिर्यादीचा मित्र असद खान व मयुर जाधव यांना चाकुने मारल्याने ते गंभीर जखमी झाले. जखमी यांना उपचारकामी दंदे हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारादरम्यान फिर्यादीचा मित्र असद खान यास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपींविरूध्द कलम १०३(१),१०९(१),१८९(२),१८९(४),१९१(२),१९१(३),१९० भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करुन व गुप्त खात्रीशीर माहितीवरुन, परिसरात आरोपींचा शोध घेवुन, आरोपी क्र. १) जितेंद्र उर्फ जंगली शिवाकांत पांडे वय २५ वर्ष रा. संजयनगर, पांढराबोडी, सिंगल लाईन, अंबाझरी, नागपूर व २) दीपक उर्फ प्रिन्स मनोज गुप्ता वय १९ वर्ष रा. पांढराबोडी, सिंगल लाईन, अंबाझरी, नागपूर ३) योगेंद्र उर्फ लाला शिवांकात पांडे वय २० वर्ष रा. संजयनगर, पांढराबोडी, सिंगल लाईन, अंबाझरी, नागपूर आणि ०४ विधीसंघर्षीत बालकांना ताब्यात घेतले असता, आरोपींनी विधीसंघर्षीत बालकांसह संगनमताने गुन्हा केल्याचे कबुल केले. आरोपींना अटक करण्यात आली होती.

गुन्ह्यातील आरोपी क्र. १ हा टोळीप्रमुख असुन, इतर ०२ आरोपी व ०४ विधीसंघर्षीत बालक हे टोळीचे सदस्य आहेत. ते कोणताही समाजमान्य कामधंदा न करता, त्यांनी नागपुर शहरात अनेक ठिकाणी जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, अवैद्य हत्यार बाळगणे, मारहाण करणे, अश्लील शिवीगाळ करणे, विनयभंग करणे असे शरीराविरूध्द अनेक गुन्हे केल्याचे तसेच, अवैध दारु बाळगून विक्री करणे अशा स्वरुपाचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असुन, त्यांचे कृत्याने सामान्य नागरिकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(i)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा— १९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ

करण्यात आली आहे. आरोपी हे मध्यवर्ती कारागृहात असुन, ४ विधीसंघर्षीत बालकांना बालसुधारगृह येथे दाखल करण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मा. सहायक पोलीस आयुक्त, सदर विभाग करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्रीमती ललिता तोडासे, पोउपनि. दीपक इंगळे, पोहवा. विनोद बरडे, नामदेव चरडे, बाळकृष्ण राठोड व पोअं. अमितकुमार तांडेकर यांनी केली.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— घरफोडीचे गुन्हयातील पाहिजे आरोपीस शस्त्रासह अटक.**

दिनांक २४.०७.२०२६ रोजी, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, लकडगंज, जरीपटका, पारडी येथील घरफोडीचे गुन्हयातील पाहिजे आरोपी विजय उर्फ काल्या हा मेकोसाबाग रोडवरील लेंडी मैदान जवळ बसून आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन तेथे जाऊन, परिसरात शोध घेतला असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसून आला. त्यास घेराव टाकून, ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव विजय उर्फ काल्या कंसराम निर्मलकर, वय ३६ वर्ष, रा. चिखली, एनआयटी क्वॉर्टर, कळमणा, नागपुर असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचेजवळ एक धारदार शस्त्र किमती १०००/—रु. चे मिळून आल्याने जप्त करण्यात आले. आरोपीस युनिट कार्यालय येथे आणून, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, तो पोलीस ठाणे जरीपटका, लकडगंज व पारडी हद्यीतील घरफोडीचे गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. फिर्यादी पोहवा राजेंद्र टाकळीकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे आरोपीविरुध्द कलम ४,२५ भा.ह.का. सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करुन, आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, पोहवा राजेंद्र टाकळीकर व पथकाने केली.



**३) कुख्यात ०२ गुंड हद्दपार :—**

पोलीस ठाणे खापरखेडा हददीत, वार्ड क्र. २, खापरखेडा, नागपूर येथे राहणारे गुन्हेगार ईसम नामे १) सुरज कन्हैयालाल कावळे, वय २५ वर्षे २) शुभम अशोक उईके वय २५ वर्ष यांचेविरूध्द पोलीस ठाणे खापरखेडा व बुटीबोरी येथे लोकांना दमदाटी व मारपीट करणे, दुखापत करणे, दरोडयाची पुर्वतयारी करणे, दरोडा घालण्याकरीता एकत्र जमणे, अवैधरित्या विनापरवाना प्राणघातक अग्निशस्त्र बाळगणे, मनाई आदेशाचे

उल्लंघन करणे, संगनमताने जबरी चोरी करणे, अश्लिल शिवीगाळ करणे, फौजदारीपात्र धाकदपटशा करुन मारण्याची धमकी देणे, जबर दुखापत घडवून आणण्याचे प्रयत्नासहीत जबरी चोरी करणे, गैरनिरोध करणे, शांतता भंग घडवून आणण्याचे उद्येशाने अपमान करणे, सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न करणे, खुनाचा प्रयत्न करणे, घातक हत्याराने ईच्छापुर्वक दुखापत करणे अशा गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमांचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता खापरखेडा पोलीसांनी आरोपींविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १०/२०२६ दिनांक २०.०७.२०२६ अन्वये गुन्हेगारांना नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतील पोलीस ठाणे पारशिवनी, खापा, सावनेर, कळमेश्वर, कन्हान, मौदा, कुही आणि बुटीबोरी हद्यीतुन ०६ महिन्यांकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी खापरखेडा पोलीसांनी दिनांक २१.०७.२०२६ रोजी केली आहे. नमुद छायाचित्रातील हद्दपार ईसम नागपुर शहर किंवा ग्रामीण हद्दीत आढळुन आल्यास पो.ठाणे खापरखेडा अथवा डायल ११२ वर कळवावे.



**सुरज**



**शुभम**

**<u>४) खापरखेडा पोलीसांची कामगिरी – मकोका मधील फरार आरोपीस अटक.</u>**

दिनांक २३.०७.२०२६ रोजी, खापरखेडा पोलीसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे अंतर्गत मकोका प्रकरणातील आरोपी राकेश सुर्यवंशी हा त्याचे घरी आला आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन पोलीस ठाणे हद्यीतील वलनी, वार्ड क्र. ६ येथे राहणारा राकेश उर्फ सोनु शिवलाल सुर्यवंशी वय ३५ वर्ष याचे राहते घरी सापळा रचून रेड कारवाई केली असता, तेथे तो मिळून आला. आरोपीस ताब्यात घेऊन, गुन्हे अभिलेख तपासला असता, तो कलम ८(क),२०(ब)ii(ब),२९ एनडीपीएस ॲक्ट, सहकलम ३,५,२५ भा.ह.का., सहकलम ३(१)(२),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा– १९९९ (मकोका) या गुन्हयात एक वर्षापासून फरार असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ६, नागपूर शहर, मा. श्री. अंकुश खेडकर, सपोआ, कामठी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. हरीष रुमकर व त्यांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे यशोधरानगर :–शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २४.०७.२०२६ चे ०२.१५ वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना वनदेवी नगर येथे एक इसम हातात लोखंडी चाकू घेवून शिवीगाळ व धूमाकूळ घालतांना दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेऊन त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अभिषेक उर्फ

कढी गणपत पराते, वय २५ वर्षे रा. बालाजी नगर, धर्माजी यांचे घरी किरायाने, उजेर किराणा जवळ, कळमणा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. रितेश दुधे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे पाचपावली** :— दिनांक २२.०७.२०२६ चे ११.४० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, जयस्वाल सेलिब्रेशन हॉलमागे, एक अनोळखी पुरुष इसम वय अंदाजे ५५ वर्ष यांचे डावे हाताला व डोक्याला दुखापत झाल्याने, गंभीर जखमी अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पिटल, ट्रामा सेंटर येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २३.०७.२६ चे ०२.०० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. रहमत शेख ९४२२११००६४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे कोराडी** :— सौ. पायल महेश मेश्राम वय २९ वर्षे, रा. श्रीवास नगर, वार्ड क्र. ५, महादुला, कोराडी, नागपूर ह्या दिनांक २०.०७.२०२६ चे १३.३० वा. चे पासुन, पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, डोळे—काळे, अंगात— निळ्या रंगाची कुर्ती व काळी लॅगीन घातलेले असून सोबत कत्था रंगाची लहान बॅग आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी** :— श्रीमती सुधा उर्फ बेबी हरीहर टिपरे वय ७९ वर्षे रा. प्लॉट क्र. १३६, विजया नेहरु सोसायटी, नरेंद्रनगर, नागपूर ह्या दिनांक १२.०७.२०२६ रोजी पासुन, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट, केस— पांढरे विरळ, डोळे—काळे, अंगात— केसरी रंगाची साडी घातलेली आहे. भाषा— मराठी बोलतात. ओळखचिन्ह—वृध्दत्वामुळे विसरभोळेपणा आहे.

**३) पोलीस ठाणे जरीपटका** :— सौ. सुनिता रॉबिन सायमन, वय ५७ वर्षे, रा. संत मार्टीन नगर, डी ब्लॉक, प्लॉट क्र. ४८३, जरीपटका, नागपूर हया दिनांक २१.०७.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा—गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट, अंगात— गुलाबी रंगाची साडी घातलेली आहे. भाषा— हिंदी बोलतात.

**४) पोलीस ठाणे कोराडी** :— सौ. पुस्तकला शामकुमार मेहरकर वय ३९ वर्षे, रा. श्रीवास नगर, वार्ड क्र. ६, पालसिंग नायकाने यांचे घराजवळ, महादुला, कोराडी, नागपूर ह्या दिनांक १५.०७.२०२६ चे १०.०० वा. चे पासुन, पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील राहते कामावर निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची— ५ फुट ६ इंच, डोळे—काळे,

केस– काळे लांब, अंगात– हिरव्या रंगाची साडी घातलेली असून पायात लाल जुती घातलेली आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**५) पोलीस ठाणे जुनी कामठी :–** कु. उजमा बानो वल्द अजीज कुरेशी वय २२ वर्षे, रा. चौधरी मस्जिद जवळ, नागपूर ही दिनांक ११.०७.२०२६ चे १३.०० वा. चे पासुन, पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीतील राहते कोणाला काही न सांगता, कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–लांब, बांधा–सडपातळ, उंची– ५ फुट २ इंच, डोळे–काळे, केस– काळे लांब, अंगात– गुलाबी रंगाचा टॉप व पांढरा पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी बोलते. ओळखचिन्ह–हनुवटीवर तिळ आहे.


सौ. पायल


श्रीमती सुधा


सौ. सुनिता


सौ. पुस्तकला


कु. उजमा

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०७०१४१ /२००१ | कलम ३७९ भादंवि | नेताजी उर्फ कृष्णाजी आडकुजी गजभिये रा. बिनाकी बुध्द विहारजवळ, पाचपावली, नागपुर | २७.०७.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**